सबसे 'तेज' ग्लोबल महातेज...!

# ग्लोबल महातेज

Postal Regd. No. JAL/443/2025-2027
RNI. NO. MAHBIL /25/A0192

https://epaper.globalmahatej.com/

वर्ष १ ले | अंक : ३२३ | शनिवार, दि. १५ ऑगस्ट २०२६ | पाने : ४ | अमळनेर | किंमत : ३ रुपये | Email - globalmahatej@gmail.com

**निवेदन**

शनिवार, दि. १५ ऑगस्ट २०२६ रोजी स्वातंत्र्य दिनानिमित्त दै. 'ग्लोबल महातेज' कार्यालय बंद राहील. त्यामुळे रविवार दि. १६ ऑगस्ट २०२६ रोजी अंक प्रसिद्ध होणार नाही. याची वाचक, जाहिरातदार, विक्रेते व हितचिंतक यांनी नोंद घ्यावी.

–संपादक

**रवि ज्वेलर्स**
सराफ बाजार, अमळनेर.
मो. ७०७४७४२१२१

**सोने-चांदी**
**आजचे भाव**

| | |
|---|---|
| २४ सोने ९९.५०% | ₹ १५०४०० |
| २२ Ct सोने ९१.६०% | ₹ १३९४०० |
| १८ Ct सोने ७५.००% | ₹ ११६००० |
| शुद्ध चांदी ९९९% | ₹ २३६०/– |

भाव प्रती १० ग्राम

# आमदार अनिलदादा पाटील यांच्या हस्ते अतिवृष्टी बाधितांना किराणा किट वाटप

## बाधित कुटुंबांनाही पुढील आठवड्यात दिली जाणार दहा हजार रुपये मदत

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : शहर व तालुक्यात ३१ जुलै २०२६ रोजी झालेल्या अतिवृष्टी आणि पुरामुळे नुकसान झालेल्या नगर परिषद हद्दीतील बाधित नागरिकांना जीवनावश्यक वस्तू आणि किराणा किटचे वाटप शुक्रवार, दि. १४ ऑगस्ट रोजी माजी मंत्री तथा आमदार अनिलदादा पाटील यांच्या हस्ते प्राथमिक स्वरूपात वाटप करून त्याचा शुभारंभ करण्यात आला.

यावेळी आमदार पाटील यांनी बाधित भागातील प्रत्येक केंद्रावर जाऊन किटचे वाटप केले. त्यानंतर बाधित नागरिकांशी संवाद साधत पुढील आठवड्यात प्रत्येक बाधित कुटुंबास शासनाकडून दहा हजार रुपये मदत दिलेल्या बँक खात्यावर जमा होईल, असे सांगितले. दरम्यान, बाधित कुटुंबांचे पंचनामे झाल्यानंतर तहसीलदार तथा तालुका दंडाधिकारी, अमळनेर यांच्या कार्यालयाकडून किराणा किट वाटपाचे आदेश पारीत करण्यात आले. सदर किट वाटप करताना आमदार पाटील यांच्यासमवेत प्रांताधिकारी मयूर भंगाळे, मुख्याधिकारी गणेश शिंदे यांच्यासह प्रशासनातील प्रमुख अधिकारी उपस्थित होते.



*अमळनेर : शहर व तालुक्यात ३१ जुलै २०२६ रोजी झालेल्या अतिवृष्टी आणि पुरामुळे नुकसान झालेल्या नगर परिषद हद्दीतील बाधित नागरिकांना शुक्रवार, दि. १४ ऑगस्ट रोजी जीवनावश्यक वस्तू आणि किराणा किटचे वाटप करताना माजी मंत्री तथा आमदार अनिलदादा पाटील. शेजारी प्रांताधिकारी मयूर भंगाळे, मुख्याधिकारी गणेश शिंदे, नगरसेविका शोभाबाई गढरे, नगरसेवक भरतकुमार ललवाणी, विजय कहारू पाटील, सचिन पाटील, देवेंद्र कांबळे, माजी नगरसेवक नरेंद्र संदानशीव, मुक्तार खाटीक, संजय कौतिक पाटील, विजय सुपडू पाटील, दुर्गेश पाटील, विनोद लांबोळे, देविदास महाजन, दिनेश शेलकर, शांताराम महाजन, प्रवीण महाजन, गंगाराम महाजन, भूषण भदाणे, वेद पाटील तसेच राष्ट्रवादी काँग्रसचे शहराध्यक्ष चेतन राजपूत, जितेंद्र ठाकूर यासह पदाधिकारी व कार्यकर्ते.*

बाधित नागरिकांना मदत मिळणे सोयीचे व्हावे, यासाठी शहरातील विविध आठ ठिकाणी केंद्र करण्यात आले होते. यामध्ये भोई समाज मंगल कार्यालय, पैलाड, शहरी आरोग्यवर्धिनी केंद्र, ताडेपुरा, डॉ. बाबासाहेब आंबेडकर सभागृह, गांधलीपुरा, संत सखाराम महाराज वाडी, शिवाजी विद्यामंदिर, तांबेपुरा, क्षत्रिय कांचमाळी पंचमढी, बहादरपूर नाका रोड, शिवम कुटी बोर्डाजवळ, झामी चौक, विद्या विहार कॉलनी गेटजवळ आदी केंद्रांवर हे वाटप करण्यात आले. सुमारे १७०० पेक्षा अधिक कुटुंबांना ही मदत मिळाली असून, या वाटप प्रक्रियेत प्रतिबाधित कुटुंबास एक किराणा किट देण्यात आले आणि मदत देताना लाभार्थ्यांचा फोटो आणि वाटप केल्याबाबतची स्वाक्षरी घेण्यात आली.

यावेळी नगरसेवक भरतकुमार ललवाणी, नगरसेविका शोभाबाई गढरे, नरेंद संदानशीव, विजय कहारू पाटील, सचिन पाटील, देवेंद्र कांबळे, मुक्तार खाटीक, संजय कौतिक पाटील, विजय सुपडू पाटील, दुर्गेश पाटील, विनोद लांबोळे, देविदास महाजन, दिनेश शेलकर, शांताराम महाजन, प्रवीण महाजन, गंगाराम महाजन, भूषण भदाणे, वेद पाटील तसेच राष्ट्रवादी काँग्रसचे शहराध्यक्ष चेतन राजपूत, जितेंद्र ठाकूर यासह पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

### वंचित कुटुंबांनाही मदतीसाठी जिल्हाधिकाऱ्यांशी संपर्क

सदर प्रक्रियेत बाधित झालेल्या काही कुटुंबांची नावे मदतीच्या यादीत नसल्याचे निदर्शनास आल्यानंतर आमदार अनिलदादा पाटील यांनी प्रांताधिकारी तसेच जिल्हाधिकारी रोहन घुगे यांच्याशी मोबाईलवरून तत्काळ संवाद साधत लवकरच या कुटुंबांना देखील किराणा किट उपलब्ध करून द्यावे, अशी मागणी केली.

**आजचे अभीष्टचिंतन**



श्री. संदीप काळे
आंतरराष्ट्रीय अध्यक्ष (VOM)



श्री. सुभाष पाटील
ज्येष्ठ पत्रकार / साहित्यिक



श्री. श्याम संदानशीव
अमळनेर



श्री. विजय वाणी
अमळनेर



श्री. पप्पू लोणभे
अमळनेर



श्री. अमोल नंदवे
अमळनेर

# नागरिकांनो, घराच्या परिसरात पाणी साचू देऊ नका

## पालिकेचे आवाहन; शहरात डास प्रतिबंधक फवारणी व मलेरिया ऑइल टाकण्याची मोहीम

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : येथील पालिकेच्या स्वच्छता विभागातर्फे नगराध्यक्ष डॉ. परीक्षित बाविस्कर व मुख्याधिकारी गणेश शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली शहरातील नागरिकांचे आरोग्य सुरक्षित राहावे आणि डासांमुळे होणाऱ्या आजारांना प्रतिबंध व्हावा, यासाठी विशेष स्वच्छता व डास प्रतिबंधक मोहीम राबविली जात आहे. शहरातील प्रभाग क्रमांक १ ते १८ मधील विविध भागांमध्ये डास प्रतिबंधक औषधांची फवारणी करण्यात येत असून, ज्या ठिकाणी पाणी साचलेले आहे अशा ठिकाणी मलेरिया ऑइलचाही वापर करण्यात येत आहे. त्यामुळे नागरिकांनीही आपल्या घराच्या परिसरात पाणी साचणार नाही, याची काळजी घ्यावी. घराभोवतीची भांडी, टायर, डबे, कुंड्या, गटारी किंवा इतर ठिकाणी पाणी साचले असल्यास ते तत्काळ काढून टाकावे आणि नगर परिषद स्वच्छता विभागास सहकार्य करावे, असे आवाहन करण्यात आले आहे



*अमळनेर : येथील नगर परिषदेच्या स्वच्छता विभागातर्फे नगराध्यक्ष डॉ. परीक्षित बाविस्कर व मुख्याधिकारी गणेश शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली शहरातील नागरिकांचे आरोग्य सुरक्षित राहावे आणि डासांमुळे होणाऱ्या आजारांना प्रतिबंध व्हावा, यासाठी विशेष स्वच्छता व डास प्रतिबंधक मोहीम राबविताना पालिका कर्मचारी.*

पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर डासांची उत्पती होऊ नये, तसेच मलेरिया, डेंग्यू यांसारख्या डासांपासून होणाऱ्या आजारांचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी नगर परिषदेतर्फे ही प्रतिबंधात्मक कार्यवाही सातत्याने केली जा आहे. या मोहिमेसाठी भरत आगळे, प्रवीण बिऱ्हाडे, योगेश पवार, सतीश बिऱ्हाडे, विजय पाटील व मनोज गरुड यांच्या कर्मचारी पथकासह प्रभाग क्रमांक १ ते १८ मधील सर्व मुकादम व स्वच्छता कर्मचारी यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

संबंधित पथकांकडून विविध भागांची पाहणी करून आवश्यक त्या ठिकाणी फवारणी तसेच साचलेल्या पाण्यावर मलेरिया ऑइल टाकण्याची कार्यवाही केली जात आहे. स्वच्छ व निरोगी अमळनेर, डासमुक्त अमळनेर या उद्देशाने नगर परिषद प्रशासनाकडून आवश्यक त्या उपाययोजना करण्यात येत आहे.



*अमळनेर : येथील श्री मंगळग्रह मंदिरातील श्री मंगळदेवांच्या मूर्ती सभोवताली स्वातंत्र्यदिनाच्या पूर्वसंध्येस करण्यात आलेली राष्ट्रध्वज तिरंगाची आकर्षक सजावट. (छायाचित्र : नितेश बारी)*

**दि. १६ ऑगस्टचे अभीष्टचिंतन**



श्री. नारायण चौधरी
अमळनेर



श्री. सुरेंद्र कोठारी
अमळनेर

# अमळनेरमध्ये राबविणार 'दोन तास मोबाईलपासून मुक्ती'

## 'पीटीए' आणि नगर परिषद यांच्यातर्फे विद्यार्थ्यांमध्ये अभ्यासाची गोडी वाढविण्यासाठी उपक्रम

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : विद्यार्थ्यांमध्ये अभ्यासाची गोडी, एकाग्रता आणि वाचनाची आवड वाढावी, तसेच मोबाईल व टीव्हीच्या अतिवापराला आळा बसावा, या उद्देशातून येथील पीटीए क्लासेस संघटनेने 'दोन तास मोबाईलपासून मुक्ती' या अभिनव उपक्रमाची संकल्पना पुढे आणली आहे. अमळनेर नगर परिषद आणि पीटीए यांच्या संयुक्त विद्यमाने लवकरच हा उपक्रम राबविला जाणार आहे.

यासंदर्भात 'पीटीए'च्या पदाधिकाऱ्यांनी उपनगराध्यक्ष प्रशांत निकम तसेच पालिका शिक्षण सभापती नाविद शेख यांची भेट घेऊन या उपक्रमाची माहिती दिली. दोन्ही पदाधिकाऱ्यांनी या संकल्पनेचे स्वागत करून सकारात्मक प्रतिसाद दिला आहे.

या उपक्रमांतर्गत दररोज सायंकाळी ७ ते रात्री ९ हे दोन तास विद्यार्थ्यांनी मोबाईल आणि टीव्हीपासून दूर राहून अभ्यास, वाचन व ज्ञानार्जनासाठी वेळ द्यावा, अशी संकल्पना आहे. सायंकाळी ७ वाजता विशेष सायरन वाजवून शहरातील विद्यार्थ्यांना 'अभ्यासाची वेळ सुरू झाली' असा संदेश देण्याची कल्पनाही मांडण्यात आली आहे. विद्यार्थ्यांमध्ये स्व-अनुशासन, वेळेचे नियोजन आणि नियमित अभ्यासाची सवय निर्माण करण्याबरोबरच त्यांच्या शैक्षणिक प्रगतीला चालना देणे, हा उपक्रमाचा प्रमुख उद्देश आहे. हा उपक्रम केवळ पीटीए किंवा नगर परिषदेपुरता मर्यादित न राहता विद्यार्थी, पालक, शिक्षक आणि संपूर्ण शहराने स्वीकारलेली शैक्षणिक चळवळ व्हावी, अशी अपेक्षा आहे.

या भेटीप्रसंगी 'पीटीए'चे अध्यक्ष भैयासाहेब मगर, सौ. सूरश्रीताई वैद्य, सुधीर टाकणे, सौ. वैशालीताई निकम, मयूर भावसार, स्वर्णदीप राजपूत आदी उपस्थित होते.



*अमळनेर : विद्यार्थ्यांमध्ये अभ्यासाची गोडी, एकाग्रता आणि वाचनाची आवड वाढावी, तसेच मोबाईल व टीव्हीच्या अतिवापराला आळा बसावा, या उद्देशातून 'दोन तास मोबाईलपासून मुक्ती' या अभिनव उपक्रमाची संकल्पना उपनगराध्यक्ष प्रशांत निकम व शिक्षण सभापती नाविद शेख यांच्याकडे मांडताना पीटीए क्लासेस संघटनेचे अध्यक्ष ॲड. भैयासाहेब मगर, सौ. सूरश्रीताई वैद्य, सुधीर टाकणे, सौ. वैशालीताई निकम, मयूर भावसार, स्वर्णदीप राजपूत आदी.*

# तहसीलदार सुराणांच्या निलंबनाविरोधात महसूल संघटनेचा आक्रमक पवित्रा

## निलंबनाची कारवाई एकतर्फी व अन्यायकारक असल्याचा आरोप करीत पुनर्नियुक्तीची मागणी

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : येथील तहसीलदार रूपेशकुमार सुराणा यांच्यावर करण्यात आलेल्या निलंबनाच्या कारवाईविरोधात महाराष्ट्र राज्य तहसीलदार व नायब तहसीलदार संघटना, जळगाव जिल्हा शाखेने आक्रमक भूमिका घेतली आहे. श्री. सुराणा यांच्यावरील निलंबनाची कारवाई एकतर्फी असून, नैसर्गिक न्यायतत्त्वांचे उल्लंघन करणारी व अन्यायकारक असल्याचा आरोप संघटनेने केला असून, श्री. सुराणा यांना सुनावणीची संधी दिली जावी. तसचे अमळनेर तहसीलदार म्हणून त्यांनी अवैध गौण खनिजाविरोधात केलेल्या कारवायांचा विचार केला जाऊन त्यांच्यावरील निलंबनाची कारवाई मागे घेऊन त्यांना मूळ पदावर पूर्ववत नियुक्त करावे, अशी निवेदनाद्वारे मागणी केली आहे.



*अमळनेर : येथील तहसीलदार रूपेशकुमार सुराणा यांच्यावर करण्यात आलेल्या निलंबनाच्या कारवाईविरोधात महाराष्ट्र राज्य तहसीलदार व नायब तहसीलदार संघटना, जळगाव जिल्हा शाखेतर्फे गुरुवार, दि. १३ ऑगस्ट २०२६ रोजी अपर मुख्य सचिव (महसूल), मंत्रालय, मुंबई यांच्याकडे पाठविले जाणारे निवेदन जिल्हाधिकारी रोहन घुगे यांच्याकडे देताना तहसीलदार व नायब तहसीलदार संघटनेचे पदाधिकारी.*

गुरुवार, दि. १३ ऑगस्ट २०२६ रोजी संघटनेने अपर मुख्य सचिव (महसूल), मंत्रालय, मुंबई यांच्याकडे हे निवेदन जिल्हाधिकाऱ्यांमार्फत पाठविले असून, त्यावर तहसीलदार व नायब तहसीलदार संघटनेच्या पदाधिकाऱ्यांसह अनेक अधिकाऱ्यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

निवेदनात म्हटले आहे, की महाराष्ट्र शासनाच्या महसूल व वन विभागाच्या बुधवार, दि. १२ ऑगस्ट २०२६ रोजीच्या आदेशानुसार श्री. सुराणा यांच्यावर निलंबनाची कारवाई केली गेली आहे. अमळनेर तालुक्यातील अवैध गौण खनिज उत्खनन व वाहतुकीस प्रतिबंध करण्याची वैधानिक प्रशासकीय जबाबदारी असताना त्यांची भूमिका निष्क्रिय व बेजबाबदारपणाची आहे. श्री. सुराणा यांनी पदस्थापनेपासून अवैध वाळू उत्खनन व वाहतुकीविरोधात सातत्याने कारवाया केल्या आहेत. तापी व गिरणा या नद्यांच्या पात्रातील अवैध वाळू उपशाविरोधात मागील सहा महिन्यांत तहसील कार्यालयाकडून वाहने व यंत्रसामग्री जप्त करण्यात आली, लाखो रुपये दंड आकारण्यात आला तसेच पोलिस ठाण्यांमध्ये गुन्हेही दाखल करण्यात आले. त्यामुळे त्यांच्यावर निष्क्रियतेचा आरोप करणे योग्य नाही.

### महसूल विभागाची एकट्याची जबाबदारी नाही

वाळूचोरी व अवैध गौण खनिज उत्खनन रोखण्याची जबाबदारी केवळ महसूल विभागाची नसून पोलीस विभाग, आरटीओ, स्थानिक प्राधिकरण तसेच ग्रामदक्षता समिती यांचीही संयुक्त जबाबदारी असल्याचे संघटनेने निवेदनात स्पष्ट केले आहे. अवैध गौण खनिजाविरोधात कारवाई करताना महसूल अधिकारी व कर्मचाऱ्यांना शारीरिक हल्ले, मानसिक त्रास तसेच धमक्यांना सामोरे जावे लागते. तरीही त्यांना अपेक्षित संरक्षण मिळत नसल्याने अधिकारी-कर्मचाऱ्यांचे मनोबल खच्चीकरण होत असल्याचा मुद्दाही संघटनेने त्यात उपस्थित केला आहे.

### लोकप्रतिनिधींच्या दबावाचाही आरोप

गौण खनिजाविरोधात कारवाई करताना लोकप्रतिनिधींकडून येणारा दबाव, गौण खनिज माफियांकडून होणाऱ्या धमक्या तसेच काही सामाजिक कार्यकर्त्यांकडून होणाऱ्या तक्रारींचा सामना महसूल अधिकारी-कर्मचाऱ्यांना करावा लागत असल्याचे संघटनेने म्हटले आहे. अशा परिस्थितीत अधिकाऱ्यांची बाजू ऐकून न घेता कारणे दाखवा नोटीस, विभागीय चौकशी किंवा निलंबनासारखी कारवाई केल्यास अधिकारी मानसिक दबावाखाली काम करतील आणि अवैध गौण खनिजाविरोधातील कारवायांवर त्याचा विपरीत परिणाम होईल, अशी भूमिका संघटनेने मांडली आहे.

दरम्यान, या प्रकरणामुळे शहरातील अवैध गौण खनिज कारवायांचा मुद्दा पुन्हा चर्चेत आला असून, शासन या निवेदनावर काय निर्णय घेते, याकडे आता लक्ष लागले आहे. ▲

# संपादकीय

## वंदे मातरम् : राष्ट्रसंस्कारांचे जागरण

भारताच्या इतिहासाला गौरवशाली आणि शौर्यशाली इतिहासाला हजारो वर्षांची परंपरा आहे. दुर्दैवाने सतत झालेल्या परकीय आक्रमणांमुळे त्याचे विस्मरण केले गेले. मोगल काळापासून ते अगदी ब्रिटिशांच्या दीडशे वर्षांच्या कालावधीत हा इतिहास पुसण्याचेच काम होत आला हे विसरता येत नाही. म्हणूनच हजारो वर्षांची परंपरा असलेली संस्कृती आणि इतिहासाचे वारंवार स्मरण करून देण्याची आवश्यकता आहे. यासाठी नवनवीन प्रकारच्या उपक्रमांची किंवा संकल्पनांची तितकीच आवश्यकता आहे. भारतात सर्वाधिक संख्येने असलेल्या युवकांसाठी संस्कृती आणि इतिहासाचे संस्मरण खूप गरजेचे ठरते. शतकानुशतके अनेक आक्रमणं सहन केलेल्या आणि तितक्याच शौर्याने ती परतवून लावण्याचा हा इतिहास भारताची फार मोठी देणगी ठरते. काळाचा प्रभाव हा व्यक्ती आणि समाजावर लवकर निर्माण होतो. स्वाभाविकपणे बदलणाऱ्या परिस्थितीशी जुळवून घेत असताना अनेक प्रेरणादायी प्रसंगांचे विस्मरण होत असते. परंतु जगाच्या इतिहासात भारतीय संस्कृती हजारो वर्षे टिकून राहिली. कारण भारताच्या जीवनमूल्यांमध्ये तिचे रहस्य दडलेले आहे. याच जीवनमूल्यांच्या आधारावर स्वातंत्र्यलढ्यातही हजारो लोकांनी आपले प्राणार्पण केले. त्या बलिदानालाही अभिवादन करीत असताना ज्या भारतमातेसाठी हा त्याग केला गेला. त्याचे आणि आपल्या भारतभूमीच्या स्वाभिमानाचा गौरव म्हणून राष्ट्रगीत आणि राष्ट्रगान तयार झाले. रवींद्रनाथ टागोर यांनी लिहीलेले जनगणमन हे राष्ट्रगीत तर बंकिमचंद्र चटोपाध्याय यांनी लिहीलेले वंदे मातरम हे राष्ट्रगान भारतीयांसाठी अत्यंत आदरातीर्थी ठरले. केंद्र सरकारने आता अधिकृतपणे वंदे मातरम् गीताच्या निर्मितीच्या दीडशेव्या वर्षानिमित्त सर्व शासकीय कार्यक्रमांमध्ये वंदे मातरम् म्हटले गेले पाहिजे, असा निर्णय केला आहे. आता तर स्वतंत्र भारताच्या इतिहासात पहिल्यांदाच यंदाच्या लाल किल्ल्यावरच्या स्वातंत्र्य दिन सोहळ्यात राष्ट्रगीतापूर्वी वंदे मातरम् गायले जाणार आहे. त्यानंतर ध्वजारोहण होईल. नंतर राष्ट्रगीत म्हटले जाणार आहे. ज्या वंदे मातरम्ने अनेक क्रांतिकारकांना प्रेरणा दिली. किंबहुना स्वातंत्र्यलढ्याचा महामंत्र म्हणून वंदे मातरम्ला स्थान मिळाले होते. त्या वंदे मातरम् गीताचा होत असलेला हा गौरव आताच्या आणि येणाऱ्या पिढीसाठी शौर्यशाली इतिहासाचे संस्मरण करून देणारा ठरतो.


ज्या वंदे मातरम्मधून भारतभूमीचे अतिशय मनोहारी वर्णन केले गेले आहे. ही भारतभूमी प्रत्येक भारतीयासाठी कशी प्राणप्रिय आहे याचेच वर्णन या राष्ट्रगानातून करून दिले गेले आहे. भारताला आज स्वातंत्र्य मिळून ८० वर्षे होत आहेत. यावेळचा हा ८० वा स्वातंत्र्य दिन या वंदे मातरम्च्या गायनाने तितकाच ऐतिहासिक ठरू शकेल. भारत हा अनेक प्रकारच्या विविधतेने नटलेला देश आहे. अनेक प्रांत, भाषा, चालीरीती, धर्म, आणि बरीच विविधता असलेली भौगोलिक परिस्थिती या सर्वांमधून देशाची एकता आणि अखंडता टिकवण्यासाठी अनेक प्रकारचे प्रयत्न करावे लागत असतात. सर्वांत महत्त्वाचे म्हणजे ही एकता राष्ट्र म्हणून व्यक्त झाली पाहिजे. पंथ, भाषाभेद, धर्म बाजूला ठेवून केवळ देशासाठी एकत्र येण्याची भावना सतत जागती ठेवण्याचे प्रयत्न गरजेचे ठरतात. आज आपण संसदीय लोकशाही व्यवस्था स्वीकारलेली आहे. देशात जवळपास भाषावार प्रांतरचना झाली. प्रत्येक राज्याची एक भावनिक किंवा प्रादेशिक अस्मिता तितकीच महत्त्वाची ठरत आलेली आहे. परंतु त्या-त्या राज्याचा इतिहास आणि लोकसंस्कृती हीसुद्धा देशाच्या एकतेच्या शृंखलेमध्ये शोभून दिसेल. अशा प्रकारची जनभावना आणि त्याविषयीचा राष्ट्रीय अभिमान राष्ट्रगीत आणि राष्ट्रगानातून व्यक्त होतो. आपल्या राष्ट्रगीतात सगळ्या प्रांतांचा उल्लेख होतो. अशा या देशाची जयगाथा म्हणजेच जनगणमन हे राष्ट्रगीत ठरते. तर या भारतभूमीला सश्यशालिनी, हमदलशोभिनी असे म्हणत तीच आपल्यासाठी सुखदाम आणि वरदाम आहे म्हणूनच तिला वंदे मातरम् असे म्हणत नमस्कार करण्याचा संस्कार व्यक्त झालेला आहे. राष्ट्राच्या संस्कृतीत असे हे शौर्याचे आणि स्वाभिमानाचे प्रसंग प्रत्येकाच्या मनावर संस्कार म्हणूनच नोंदले गेले पाहिजेत. त्याचे वेगवेगळ्या निमित्ताने केले जाणारे स्मरण जितके महत्त्वाचे आहे तितकेच त्यातून जागवला जाणारा इतिहास हा संपूर्ण देशाचाच पुरुषार्थ साकार करणारा ठरतो.

भारत स्वतंत्र झाल्यावर 'जन गण मन' हे राष्ट्रगीत म्हणून स्वीकारले तर वंदे मातरम्ला राष्ट्रगानाचा दर्जा दिला गेला. एकूणच देशाच्या शौर्यशाली इतिहासाच्या दृष्टीने आणि भारतभूमीच्या आदरासाठी दोन्हीही गीते महत्त्वाची ठरतात. अर्थात काळाच्या रेट्यामुळे वंदे मातरम् हे राष्ट्रगान अपेक्षेप्रमाणे जनमानसावर बिंबविले गेले नाही. जे राष्ट्रगान म्हणून अधिकृतपणे घोषित झाले त्याला जातीय रंग देण्याचा प्रयत्न केला गेला. म्हणजे ज्या वंदे मातरम्ने भारताच्या स्वातंत्र्यलढ्याचा एक मोठा कालावधी व्यापलेला होता, त्याविषयीचा तो एकाअर्थी अनादरच ठरतो. आता राष्ट्रगीत आणि राष्ट्रगान या दोघांच्याही गायनाने स्वातंत्र्यदिनाचा सोहळा अधिक समृद्ध होणार असेल तर त्याचे स्वागतच केले पाहिजे. कारण यामधून देशातील सामान्यातील सामान्य नागरिकांपर्यंत राष्ट्रभक्तीचा प्रभावी संदेश जाऊ शकतो. वैभवशाली इतिहासाचे पुनर्जागरण घडू शकते. आक्रमणे अनेक झाली. त्या आक्रमणांना परतवून लावणारा पुरुषार्थ हे या भारतभूमीचे वैशिष्ट्य ठरते. वंदे मातरम् हे राष्ट्रगान पराक्रमाचे तितकेच दिव्य स्वरूपाचे आवाहन आहे. जो लाल किल्ला इतिहासामध्ये परकीय आक्रमकांचाच निदर्शक मानला गेला होता. परंतु तिथेसुद्धा भारताच्या शूरवीर योद्ध्यांनी पराक्रम दाखवून परकीयांकडून तो पुन्हा प्राप्त केला होता. त्याच लाल किल्ल्यावरून घुमणारे राष्ट्रगान हे भविष्यकालीन भारतासाठी नवोत्थानासारखेच ठरू शकते. विशेषतः आज सर्वाधिक संख्येने असलेल्या भारतातील युवा पिढीसाठी वंदे मातरम्च्या माध्यमातून स्वातंत्र्यलढ्यातील शौर्यशाली संस्कारांचे दर्शन घडू शकते.

# तिरंग्याची कल्पना कुणाची? कोणी बनवला?

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

भारताचा तिरंगा दिसला की अंगावर रोमांच उभे राहतात. मनात देशाभिमानाची भावना जागी होते. पण कधी विचार केला आहे का, आपल्या या तिरंग्याची कल्पना नेमकी कुणाची होती? या प्रश्नाचे उत्तर एका अशा व्यक्तीकडे जाते, ज्यांचे नाव आजही तिरंग्याच्या इतिहासात अभिमानाने घेतले जाते ते म्हणजे पिंगली वेंकय्या.



राष्ट्रीय ध्वजाची कल्पना भारतासाठी राष्ट्रीय ध्वज तयार करण्याच्या उद्देशाने वेंकय्या यांनी विविध ध्वजांच्या रचनांचा अभ्यास केला. १९१६ मध्ये त्यांनी 'A National Flag for India' हे पुस्तक प्रकाशित केले. या पुस्तकात भारतासाठी राष्ट्रीय ध्वजाच्या २४ रचना मांडण्यात आल्या होत्या. गांधीजींसमोर मांडली रचना १९२१ मध्ये विजयवाडा येथे झालेल्या काँग्रेसच्या अधिवेशनात पिंगली वेंकय्या यांनी राष्ट्रीय ध्वजाची रचना महात्मा गांधींसमोर मांडली.

या रचनेवर पुढे चर्चा झाली आणि ध्वजामध्ये आवश्यक बदल करण्यात आले. सुरुवातीचा ध्वज कसा होता?वेंकय्या यांच्या सुरुवातीच्या रचनेत लाल आणि हिरवा रंग होता. नंतर पांढरा रंग आणि चरखा समाविष्ट करण्यात आला. चरखा हा त्या काळात स्वदेशी, स्वावलंबन आणि आर्थिक स्वातंत्र्याचे प्रतीक मानला जात होता. ध्वजाच्या रचनेत बदलराष्ट्रीय चळवळीबरोबर ध्वजाच्या रचनेतही बदल होत गेले. १९३१ मध्ये केशरी, पांढरा आणि हिरवा अशा तीन रंगांच्या ध्वजाला काँग्रेसने स्वीकारले. या ध्वजाच्या मध्यभागी चरखा होता. हा ध्वज पुढील राष्ट्रध्वजाच्या विकासातील महत्त्वाचा टप्पा ठरला.

चरख्याऐवजी अशोकचक्र स्वातंत्र्याच्या उंबरठ्यावर राष्ट्रध्वजाच्या अंतिम रचनेत महत्त्वाचा बदल करण्यात आला. चरख्याच्या जागी अशोकचक्राचा समावेश करण्यात आला. सारनाथ येथील अशोक सिंहस्तंभावरील धर्मचक्रावर आधारित अशोकचक्र तिरंग्याच्या मध्यभागी आले. अशोकचक्रात २४ आरे का? तिरंग्याच्या मध्यभागी असलेल्या अशोकचक्राला २४ आरे आहेत. हे चक्र धर्म, गती आणि सतत पुढे जाण्याचा संदेश देते. तिरंगा आपल्याला स्थिर न राहता प्रगतीच्या दिशेने वाटचाल करण्याची प्रेरणा देतो.

**तिरंग्याचे रंग काय सांगतात?**

तिरंग्यातील प्रत्येक रंगाची स्वतंत्र ओळख आहे.

**केशरी :** धैर्य आणि त्याग.

**पांढरा :** सत्य आणि शांतता

**हिरवा :** समृद्धी आणि विकास

**अशोकचक्र :** धर्म आणि गतिशीलतेचे प्रतीक.

तिरंगा फक्त ध्वज नाही. तिरंगा म्हणजे केवळ तीन रंगांचा कापडाचा तुकडा नाही. तो भारताच्या स्वातंत्र्यलढ्याची आठवण, राष्ट्रीय एकतेचे प्रतीक आणि कोट्यवधी भारतीयांच्या अभिमानाची निशाणी आहे. त्याच्याकडे पाहताना स्वातंत्र्यासाठी बलिदान देणाऱ्या असंख्य ज्ञात-अज्ञात वीरांची आठवण होते. त्याच्या विकासातील पिंगली वेंकय्या यांचे योगदान अत्यंत महत्त्वाचे आहे. २२ जुलै १९४७ रोजी संविधान सभेने सध्याच्या राष्ट्रध्वजाचा स्वीकार केला.पिंगली वेंकय्या यांच्या कल्पनेपासून सुरू झालेला हा प्रवास आज भारताच्या अभिमानाचे प्रतीक बनला आहे. ▲

# रोजच्या आहारात ओट्स का असावेत?

## जाणून घ्या 'हे' जादूई फायदे!

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**



ओट्समधील विरघळणारे तंतू पचनक्रिया सुलभ करून आतड्यांचे आरोग्य उत्तम ठेवतात. ओट्स रोज खाल्ल्यास शरीरातील वाईट कोलेस्ट्रॉल (एलडीएल) कमी होण्यास मदत होते. ज्यामुळे हृदय सुरक्षित राहते. ओट्स खाल्ल्याने पोट दीर्घकाळ भरलेले राहते. यामुळे अतिखाणे टळते आणि वजन नियंत्रणात राहते. ओट्समधील कर्बोदके हळूहळू ऊर्जेत रूपांतरित होतात. ज्यामुळे तुम्हाला दिवसभर ताजेतवाने आणि सक्रिय वाटते. ओट्स रक्तातील साखरेची पातळी नियंत्रित ठेवतात. त्यामुळे मधुमेहाच्या रुग्णांसाठी हा एक उत्तम पर्याय आहे. ओट्समध्ये मॅग्नेशियम, लोह, जस्त आणि व्हिटॅमिन-बी ही महत्त्वाची जीवनसत्त्वे भरपूर प्रमाणात असतात. ओट्समधील अँटीऑक्सिडंट्स शरीराच्या पेशींचे फ्री रेडिकल्समुळे होणाऱ्या नुकसानीपासून संरक्षण करतात. ओट्समधील 'बीटा-ग्लुकन' फायबरमुळे शरीराची रोगप्रतिकारक शक्ती वाढण्यास मदत करते. आजपासूनच तुमच्या रोजच्या नाश्त्यात ओट्सचा समावेश करा आणि राहा फिट! ▲

# ओवा कशा खाल्ल्यास मिळतात जास्त फायदे?

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

जेवणानंतर थोडा कच्चा ओवा चघळल्यास लाळ तयार होऊन अन्न पटकन पचायला मदत होते.

**गॅस आणि अपचनावर त्वरित आराम :** पोटात गॅस झाला असल्यास चिमूटभर कच्चा ओवा आणि थोडे मीठ एकत्र खाल्ल्याने लगेच आराम मिळतो.

**पोटातील जंतूंपासून मुक्ती :** कच्च्या ओव्यात अँटीबॅक्टेरियल गुणधर्म असतात, जे पोटातील हानिकारक जिवाणू नष्ट करतात.

सर्दी आणि खोकल्यावर रामबाण उपाय : कफ किंवा सर्दीचा त्रास असल्यास भाजलेला ओवा खाणे अत्यंत फायदेशीर मानले जाते.

**घशाच्या खवखवीला म्हणा 'बाय-बाय' :** हलका भाजलेला ओवा कोमट पाण्यासोबत घेतल्यास घसा साफ होतो आणि श्वसनाचा त्रास कमी होतो.

**संवेदनशील पोटासाठी हलका :** भाजल्यामुळे ओव्याचा उग्रपणा कमी होतो, ज्यामुळे नाजूक किंवा संवेदनशील पोट असणाऱ्यांना तो सहज पचतो.

**योग्य वेळी योग्य ओवा निवडा :** पोटाच्या समस्येसाठी कच्चा ओवा आणि सर्दी-कफासाठी भाजलेला ओवा (किंवा रुमालात बांधून त्याचा वास घेणे) सर्वोत्तम ठरतो. ▲





*अमळनेर : राजमाता अहिल्याबाई होळकर पुण्यतिथीनिमित्त येथील युवा कल्याण प्रतिष्ठानतर्फे आयोजित कार्यक्रमाप्रसंगी अहिल्याबाईंच्या प्रतिमेस माल्यार्पण करताना ॲड. तिलोत्तमाताई पाटील. शेजारी प्रा. अशोक पवार, सौ. कमलअक्का पाटील, अशोक पाटील, रियाज मौलाना, ॲड. रज्जाक शेख, डी. एम. पाटील, शरद धनगर, अशोक बिऱ्हाडे, बापूराव ठाकरे, भास्करराव बोरसे, संजय पाटील, चिंधू वानखेडे, बापू सांगोळे, सईद तेली, मनोज मोरे, दिलीप खांडेकर, बी. एल. सैंदाणे, गोविंदा पाटील आदी.*

# राजमाता अहिल्याबाई होळकरांच्या नावाने गरिबांना मदत द्या : ॲड. तिलोत्तमा पाटील

## राजमाता अहिल्याबाई होळकर पुण्यतिथीनिमित्त युवा कल्याण प्रतिष्ठानतर्फे कार्यक्रम

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : राजमाता अहिल्याबाई होळकर यांनी आपल्या मुलीचा आंतरजातीय विवाह केला, सती प्रथेला विरोध केला, मुलाच्या लग्नात हुंडा घेतला नाही व मुलीच्या लग्नात हुंडा दिला नाही, मुस्लीम समाजाच्या मशिदीला मदत केली, बालविवाह प्रथा बंद केली, देशभरातील लाखो शेतकऱ्यांना, गरिबांना, वंचितांना आपल्या स्वतःच्या पैशातून मदत व सहकार्य केले. या गुणांचा आदर्श जोपासण्यासाठी राजमाता अहिल्याबाई होळकर यांच्या नावाने शहरातील गरीब विद्यार्थ्यांना मदत द्यावी, असे आवाहन ॲड. तिलोत्तमाताई पाटील यांनी केले.

राजमाता अहिल्याबाई होळकर पुण्यतिथीनिमित्त येथील युवा कल्याण प्रतिष्ठानतर्फे आयोजित कार्यक्रमात त्या बोलत होत्या. प्रा. अशोक पवार अध्यक्षस्थानी होते. या कार्यक्रमास उपस्थित मान्यवरांसाठी महेश्वर सहल आयोजनाचा निर्णय मौर्य क्रांती संघाचे महाराष्ट्र उपाध्यक्ष अण्णासाहेब भागवत यांनी जाहीर केला. तसेच अहिल्याबाई होळकर यांचा जीवनपट सविस्तरपणे आपल्या भाषणातून मांडला. याप्रसंगी सौ. कमलअक्का पाटील, अशोक पाटील, रियाज मौलाना, ॲड. रज्जाक शेख, डी. एम. पाटील, शरद धनगर आदींचीही भाषणे झाली.

यावेळी अशोक बिऱ्हाडे, बापूराव ठाकरे, भास्करराव बोरसे, संजय पाटील, चिंधू वानखेडे, बापू सांगोळे, सईद तेली, मनोज मोरे, दिलीप खांडेकर, बी. एल. सैंदाणे, गोविंदा पाटील आदी उपस्थित होते. डी. ए. पाटील यांनी सूत्रसंचालन केले. एस. सी. तेले यांनी आभार मानले. ▲

हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक व मालक श्री. आनंद डिगंबर महाले यांनी महातेज पब्लिकेशनसाठी अविष्कार ग्राफिक्स, प्लॉट नं. 17, रामचंद्र नगर, भुसावळ रोड, जळगाव (महाराष्ट्र) 425002 येथे छापून गट नं. 160, प्लॉट नं. 51/52, सुप्रभा अपार्टमेंट, मराठा मंगल कार्यालयाजवळ, पटवारी कॉलनी, अमळनेर, जि. जळगाव (महाराष्ट्र) 425401 येथे प्रसिद्ध केले. संपादक :- आनंद डिगंबर महाले (रजि नं. MAHBIL/25/A0192), कार्यकारी संपादक श्री. भरत रघुनाथ पाटील ( पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची राहील.) या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यातून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक व कार्यकारी संपादक सहमत असतीलच असे नाही. महातेज पब्लिकेशन तथा ग्लोबल महातेज संबंधित कोणतेही वाद तथा खटले फक्त अमळनेर न्यायालयातच चालविले जातील. संपर्क : 7711004040, 7711004242, ई-मेल : globalmahatej@gmail.com



# यूपीएससी में १२वीं रैंक, जेकेएएस में चौथा स्थान

## कौन हैं सना फयाज, खूब हो रही चर्चा...!

**सक्सेस स्टोरी**

ग्लोबल महातेज वृत्तसेवा

कहा जाता है कि अगर इरादे बुलंद हों और लगन सच्ची हो तो कोई भी मंजिल दूर नहीं होती। इस बात को एक बार फिर सच साबित कर दिखाया है श्रीनगर की रहने वाली सना फयाज ने। उत्तराखंड की राजधानी देहरादून स्थित इंदिरा गांधी राष्ट्रीय वन अकादमी (आयजीएनएफए) के दीक्षांत समारोह में २०२४ बैच की भारतीय वन सेवा (आईएफएस) अधिकारी सना फयाज ने अपनी काबलियत का लोहा मनवा दिया। हाल ही में आयोजित हुए इस गरिमामयी समारोह में सना को उनके असाधारण प्रदर्शन के लिए एक-दो नहीं, बल्कि पूरे ५ प्रतिष्ठित पुरस्कारों से सम्मानित किया गया। सना संघ लोक सेवा आयोग (यूपीएससी) के जरिए सीधी भर्ती से आईएफएस बनने वाली कश्मीर घाटी की पहली महिला अधिकारी हैं।

### केंद्रीय मंत्री भूपेंद्र यादव ने सौंपे सम्मान

दीक्षांत समारोह में केंद्रीय पर्यावरण, वन और जलवायु परिवर्तन मंत्री भूपेंद्र यादव मुख्य अतिथि के तौर पर शामिल हुए। उन्होंने सना फयाज को ये पुरस्कार सौंपे और उनकी लगन व दक्षता की जमकर तारीफ की। अपनी कठिन ट्रेनिंग के दौरान सना ने पढ़ाई-लिखाई, फील्डवर्क और वनों के बेहतर प्रबंधन में जो उत्कृष्ट प्रदर्शन किया, उसने उन्हें अपने पूरे बैच के सबसे होनहार अफसरों की कतार में सबसे आगे लाकर खड़ा कर दिया।

### सना को मिले ५ बड़े अवॉर्ड्स

**डॉ. बी.एन. गांगुली अवॉर्ड :** अकादमिक क्षेत्र में सर्वोच्च प्रदर्शन के लिए।
**सीनियर फॉरेस्टर प्राइज :** बेस्ट फील्ड फॉरेस्टर के रूप में उत्कृष्ट जमीनी काम के लिए।
**डी.सी. अग्रवाल प्राइज :** भूमि प्रबंधन और मृदा संरक्षण में महारत के लिए।
**सुलोचना नायडू मेमोरियल प्राइज :** ट्रेनिंग के दौरान ऑलराउंड परफॉर्मेंस के लिए।
**के.पी. सगरेया श्रेष्ठ वणिक पुरस्कार :** वानिकी क्षेत्र में बेहतरीन समझ और योगदान के लिए।

### ऐसे तय किया सफलता का सफर

सना फयाज श्रीनगर के पीरबाग इलाके की रहने वाली हैं। उनकी शुरुआती पढ़ाई श्रीनगर के प्रेजेंटेशन कॉन्वेंट हायर सेकेंडरी स्कूल से हुई। इसके बाद उन्होंने एनआईटी श्रीनगर से बी.टेक की डिग्री हासिल की और फिर पर्यावरण के प्रति अपने लगाव की वजह से 'क्लाइमेट चेंज स्टडीज' में पोस्ट ग्रेजुएशन किया। हालांकि, सिविल सेवा तक पहुंचने का उनका रास्ता इतना सीधा और आसान नहीं था। शुरुआती दौर में उन्हें यूपीएससी सिविल सेवा और जम्मू-कश्मीर प्रशासनिक सेवा (जेकेएएस) दोनों में असफलताओं का सामना करना पड़ा। लेकिन उन्होंने हार मानने के बजाय अपनी कमियों को सुधारा और दोगुनी मेहनत से तैयारी में जुट गईं। वर्ष २०२१ में सना की मेहनत रंग लाई और उन्होंने एक साथ दो बड़ी परीक्षाएं पास कीं, जिसमें जेकेएएस परीक्षा २०२१ में उन्होंने पूरे प्रदेश में चौथी रैंक हासिल की। वहीं यूपीएससी सिविल सेवा २०२१ परीक्षा में सफलता पाकर 'इंडियन ट्रेड सर्विस' (आयटीएस) में असिस्टेंट डायरेक्टर जनरल का पद संभाला। इतनी प्रतिष्ठित केंद्रीय सेवा में चयनित होने के बाद भी सना का दिल पर्यावरण और वनों की सुरक्षा में ही बसा था। उन्होंने अपनी तैयारी जारी रखी और यूपीएससी आयएफएस परीक्षा २०२३ में पूरे देश में १२वीं रैंक हासिल कर अपना असली सपना पूरा कर दिखाया।


### अपने गृह राज्य में ही संभालेंगी जिम्मेदारी

एजीएमयूटी कैडर की यह अधिकारी अपनी ट्रेनिंग पूरी करने के बाद अब जम्मू-कश्मीर में ही अपनी सेवाएं देने जा रही हैं। ऐसे समय में जब जलवायु परिवर्तन, जैव विविधता का संरक्षण और जंगलों की सुरक्षा बेहद गंभीर मुद्दे बन चुके हैं, सना की यह तैनाती काफी अहम मानी जा रही है। दीक्षांत समारोह के दौरान केंद्रीय मंत्री भूपेंद्र यादव ने नए IFS अधिकारियों को शुभकामनाएं देते हुए कहा कि ये अधिकारी देश की कुदरती धरोहर के रखवाले हैं। प्रधानमंत्री नरेंद्र मोदी के विकसित भारत २०४७ के सपने को पूरा करने में इन युवा अफसरों की वैज्ञानिक सोच और पर्यावरण संरक्षण की भावना बेहद कारगर साबित होगी।

### घाटी की बेटियां आगे आएं : सना फयाज

***पुरस्कार प्राप्त करने के बाद सना फयाज ने खुशी जाहिर करते हुए कहा कि वह उम्मीद करती हैं कि उनकी इस यात्रा से जम्मू-कश्मीर के युवा, खासकर लड़कियां जरूर प्रेरित होंगी। उन्होंने कहा, "मुझे उम्मीद है कि जम्मू-कश्मीर की और भी महिलाएं भारतीय वन सेवा को करियर के रूप में चुनेंगी। हमारे क्षेत्र में कई युवाओं को अभी भी आईएफएस की संभावनाओं के बारे में पूरी जानकारी नहीं है। यह सेवा सिर्फ एक नौकरी नहीं है, बल्कि वाइल्डलाइफ, क्लाइमेट चेंज, पॉल्यूशन और प्राकृतिक आपदाओं से निपटने के लिए सीधे जमीन पर काम करने का एक बेहतरीन मंच है।"***






# बच्चों के लिये बनाइए बेहद मुलायम और स्पांजी तिरंगा इडली

ग्लोबल महातेज वृत्तसेवा

अगर आप स्वतंत्रता दिवस या किसी खास अवसर पर बच्चों के लिए कुछ स्वादिष्ट, पौष्टिक और आकर्षक बनाना चाहते हैं, तो तिरंगा इडली एक बेहतरीन विकल्प है। यह देखने में रंग-बिरंगी होती है, खाने में बेहद मुलायम और स्पांजी होती है, साथ ही बच्चों को सब्जियों का पोषण भी आसानी से मिल जाता है. आइए जानते हैं इसकी आसान रेसिपी।



### सामग्री

२ कप इडली का बैटर
१/२ कप पालक की प्यूरी
१/२ कप गाजर की प्यूरी
१ छोटा चम्मच तेल
स्वादानुसार नमक
इडली सांचा

### बनाने की विधि

**१) बैटर तैयार करें**

सबसे पहले तैयार इडली बैटर को तीन बराबर हिस्सों में बांट लें।

पहले हिस्से को सफेद ही रहने दें।

दूसरे हिस्से में पालक की प्यूरी मिलाकर हरा रंग तैयार करें।

तीसरे हिस्से में गाजर की प्यूरी मिलाकर नारंगी रंग तैयार करें।

ध्यान रखें कि सभी बैटर की कंसिस्टेंसी लगभग समान हो ताकि इडली अच्छी तरह फूले।

**२) इडली सांचा तैयार करें**

इडली मोल्ड में हल्का तेल लगाएं. इससे इडली आसानी से निकल जाएगी और उसकी बनावट भी खराब नहीं होगी।

**३) तिरंगे की परतें बनाएं**

अब प्रत्येक मोल्ड में सबसे पहले नारंगी बैटर डालें। इसके ऊपर सफेद बैटर की परत लगाएं और अंत में हरे बैटर की परत डालें। परतें बहुत मोटी न रखें ताकि तीनों रंग साफ दिखाई दें।

**४) स्टीम करें**

स्टीमर या इडली कुकर में पानी गर्म करें। इडली स्टैंड को स्टीमर में रखकर १२ से १५ मिनट तक पकाएं। बीच में ढक्कन न खोलें. पकने के बाद टूथपिक डालकर जांच लें। यदि टूथपिक साफ बाहर आ जाए तो इडली तैयार है।

**५) परोसें**

इडली को ५ मिनट ठंडा होने दें, फिर चम्मच की मदद से निकालें। नारियल चटनी, टमाटर चटनी या हल्के सांभर के साथ बच्चों को परोसें।

### स्पांजी और सॉफ्ट बनाने के टिप्स

ताजा और अच्छी तरह फर्मेंटेड बैटर का उपयोग करें।

बैटर को ज्यादा न चलाएं, इससे उसमें मौजूद हवा निकल जाती है।

स्टीम करते समय पानी पर्याप्त मात्रा में होना चाहिए।

पालक और गाजर की प्यूरी बहुत पतली न रखें।

इडली पकने के तुरंत बाद न निकालें, कुछ मिनट ठंडा होने दें।

### पोषण का खजाना

तिरंगा इडली सिर्फ देखने में आकर्षक नहीं होती, बल्कि पौष्टिक भी है। पालक से आयरन और विटामिन मिलते हैं, जबकि गाजर विटामिन ए का अच्छा स्रोत है। चावल और उड़द दाल से शरीर को ऊर्जा और प्रोटीन मिलता है। यही वजह है कि यह बच्चों के टिफिन, नाश्ते या खास समारोहों के लिए एक हेल्दी विकल्प है।

# पाकिस्तानी अधिकाऱ्याने अखेर भारताची ताकद केली मान्य!

ग्लोबल महातेज वृत्तसेवा



ऑपरेशन सिंदूरला वर्ष लोटल्यानंतर आता महत्वाची माहिती समोर आली आहे. खुद्द पाकिस्तानी एअर फोर्सच्या माजी अधिकाऱ्याने ही कबुली दिली आहे. ऑपरेशन सिंदूर लॉन्च केल्यानंतर चार दिवस जो सैन्य संघर्ष चालला, त्यात पाकिस्तानी सैन्य दलांची काय स्थिती झालेली, ते वास्तव समोर आले आहे. एअर कमोडोर खालिद चिश्ती हे पाकिस्तानी एअरफोर्समधील निवृत्त अधिकारी आहेत. त्यांनी एका मुलाखतीत काही आतील गोष्टी सांगितल्या. मे २०२५ मध्ये भारताने ऑपरेशन सिंदूर लॉन्च केले होते. ऑपरेशन सिंदूरवेळी राफेल फायटर जेट्सची इतकी दहशत होती, की पाकिस्तानी एअर फोर्सवर आपली एफ-१६ फायटर जेट्स लपवून ठेवण्याची वेळ आलेली. राफेल हे ज्याप्रमाणे भारताचे अत्याधुनिक फायटर जेट आहे, तसेच एफ-१६ हे पाकिस्तानचे टॉप फायटर विमान आहे. पण भारताच्या कारवाईचा वेग असा होता, की पाकिस्तानला हे विमानच लपवून ठेवावे लागले. आता वर्षभरातून ही वस्तुस्थिती समोर आली आहे.

एफ-१६ मध्ये बीव्हीआर मिसाइल्सची कमतरता असल्याकडे कमोडोर खालिद चिश्ती यांनी लक्ष वेधले. बीव्हीआर मिसाइल्स म्हणजे नजरेपलीकडे जाऊन लक्ष्यभेद करण्याची क्षमता. एफ-१६ मध्ये ७०-१०० किलोमीटर रेंजची मिसाइल्स आहेत. त्या तुलनेत इंडियन एअर फोर्सच्या राफेल जेटमध्ये बसविलेल्या मेटियोर मिसाइलची रेंज १५० किलोमीटरपेक्षा पण जास्त आहे. त्यामुळे राफेलच्या रेंजमध्ये आल्यानंतर शत्रूच्या फायटर जेटचा शेवट निश्चित आहे. त्यामुळेच पाकिस्तानला आपली एफ-१६ लपवून ठेवावी लागली. पाकिस्तानी एअर फोर्सची सर्वाधिक भिस्त एफ-१६ फायटर जेटवरच आहे. पण आता त्यांच्याच एअरफोर्सच्या सीनिअर अधिकाऱ्याने एफ-१६ ची पोलखोल केली आहे. चिश्ती यांनी जाहीरपणे ही गोष्ट मान्य केली, की एफ-१६ विमानांमधील एआयएम-१२० एएमआरएएएम मिसाइलची रेंज राफेलमध्ये असलेल्या मेटियोरपेक्षा कमी आहे.

### आतपर्यंत घुसून ९ दहशतवादी तळ नष्ट

पहलगाम दहशतवादी हल्ल्याचा बदला म्हणून भारताने पाकिस्तान विरोधात ऑपरेशन सिंदूर लॉन्च केले होते. ७ मे २०२५ रोजी या ऑपरेशनची सुरूवात झाली. भारताने पीओके आणि पाकिस्तानच्या आतपर्यंत घुसून ९ दहशतवादी तळ नष्ट केले. यात जैश-ए-मोहम्मदचा बहावलपूरचा बालेकिल्ला आणि लश्कर-ए-तैयबाच मुख्यालय मुरीदके सुद्धा होते. मुजफ्फराबाद आणि कोटली येथील लॉन्चपॅड्स सुद्धा नष्ट केले होते.

# खरे पनीर कसे ओळखाल?

ग्लोबल महातेज वृत्तसेवा

खरे पनीर कसे ओळखायचे? हा प्रश्न जर पडला असेल तर त्यासंबंधीच्या सर्व विविध बाबी आवर्जून तपासून बघा.

* पनीरचा एक तुकडा घ्यायचा, तो पाण्यात बॉईल (उकळायचा) करायचा. ते थंड झाले की त्यावर म्हणजे पनीरवर आयोडीनचे काही थेंब टाकायचे. जर पनीरचा तुकडा निळा झाला तर लक्षात घ्यायचे की त्यामध्ये स्टार्च आहे, म्हणजे ते बोगस किंवा ॲनालॉग पनीर आहे.
* फ्राय पॅनवर एक पनीरचा तुकडा घ्यायचा. गरम झाल्यानंतर त्याचा कलर ब्राऊन झाला तर ते खरे पनीर, म्हणजे थोडा तांबूस झाला तर. पण जर पनीरचा तुकडा गरम झाल्यावर त्यातून ऑईल सुटायला लागले किंवा पाणी सुटायला लागले किंवा ते रबरासारखे होऊन त्याचा रंग थोडा काळा-निळा व्हायला लागला किंवा त्याचा जर आकार बदलायला लागला, तर ओळखून घ्यायचे की हे बोगस पनीर आहे, हे ॲनालॉग पनीर आहे.

असो, तर अन्न व औषध प्रशासन आयुक्त (एफडीए) तुकाराम मुंढे साहेबांना हे करण्याची गरज का पडली? हा प्रश्न जास्त महत्त्वाचा आहे आणि म्हणून हे आपण जाणून घेत आहोत.



'एफडीए'ने जे नमुने तपासले महाराष्ट्रभरामध्ये, त्यातील ३२ टक्के नमुने पनीरचे असुरक्षित असल्याचे आढळून आले. म्हणजे ते बोगस अर्थात ॲनालॉग पनीर असल्याचे आढळून आले. म्हणजे बाजारात मिळणारे किंवा हॉटेलमध्ये आपण ज्या पनीरवर ताव मारतो, सॉरी टू से बट 'वो दूध का पनीर नही है बॉस'. दुधाचे पनीर नाही ते.

ग्राहकाला पनीर मागितल्यावर पनीरच मिळेल याची कुठलीही गॅरंटी नाही. त्यामुळे ग्राहकाची दिशाभूल होऊ नये म्हणून मुंढे साहेबांनी एका वर्षासाठी ॲनालॉग पनीरवर बंदी घातली आहे. शुद्ध अन्न मिळणे हा नागरिकांचा अधिकार आहे, त्या हेतूने ही कारवाई करण्यात आली आहे.

महत्त्वाचे म्हणजे हा आदेश फक्त विक्रेत्यांसाठी नाही, म्हणजे केवळ हॉटेल चालकांसाठी नाही, केवळ हॉटेलवाल्यांवर ती कारवाई होणार नाही. हा आदेश जो आहे तो उत्पादक, वाहतूकदार, वितरक, अन्न व्यावसायिक अर्थात हॉटेलवाले आणि या सगळ्यांनी जर नियम मोडला, म्हणजे यातील कुणीही नियमाच्या बाहेर जाऊन ते पनीर विकण्याचा किंवा वितरीत करण्याचा प्रयत्न केला, तर कायदा त्याची नोंद घेईल आणि त्यांच्यावर कारवाई होईल. त्यामुळे आता हॉटेलमध्येही ॲनालॉग पनीर विकता येणार नाही आणि त्याच ॲनालॉगच्या जीवावर जो हातभर लांब मेन्यू ठेवला जातो ना - हे पनीर, ते पनीर, अमुक पनीर, तमुक पनीर - तेही कदाचित आता आपल्याला पाहायला मिळेल की नाही सांगता येणार नाही.

# चेंडू फेकून ठरविले जाते 'या' देशात लग्न!

## हजारो वर्षांपासूनची ही परंपरा नेमकी कुठे आहे टिकून?

ग्लोबल महातेज वृत्तसेवा

तुम्ही कधी अशा प्रथेबद्दल ऐकले आहे का, की ज्यात चेंडू फेकून लग्न ठरविले जाते. हे ऐकायला थोडे विचित्र वाटेल, पण हजारो वर्षांपासून चालत आलेली ही परंपरा आजही टिकून आहे. तरुणी आपल्या बाल्कनीतून चेंडू फेकतात आणि जो पुरुष तो झेलतो, तो त्यांचा नवरा बनतो.

जगभरात वधू वराची निवड करण्याची पद्धत वेगवेगळी असते. कुठे वर एखादा अचाट पराक्रम करून दाखवितो, त्यानंतर वधू त्याला पसंद करते. मात्र, एका देशात महिला बाल्कनीत उभे राहून एक चेंडू खाली उभ्या असलेल्या तरुणांच्या दिशेने फेकतात. त्यानंतर जो तरुण हा चेंडू अलगद झेलतो त्याला ती वधू आपला भावी वर म्हणून पसंद करते. ही प्राचीन वर निवडण्याची परंपरा या देशातील आदिवासी जातीमध्ये असल्याचे दाखले दिले जातात.

सत्य कहाणी थोडी वेगळी आहे. चेंडू फेकण्याची परंपरा चीनमध्ये जरूर आहे. मात्र, आता बाल्कनीतून चेंडू फेकून कोणा अनोळखी तरुणाला पती निवडण्याची प्रथा पाळली जात नाही. आता सर्व काही आधीच ठरलेले असते. म्हणजे दक्षिण चीनच्या गुंआंग्शी भागात राहणारे झुआंग समुदायात हा चेंडू प्रेमाची कबुली देण्याची एक पारंपरिक पद्धत आहे. यात एकमेकांना पसंद करणारे तरुण-तरुणीच एकमेकांकडे नेम धरून चेंडू फेकतात.



जुने चिनी कादंबरी आणि पीरियड ड्रामामध्ये चेंडूद्वारे पती निवडण्याची प्रथा अनेकदा पाहायला मिळाली आहे. १६ व्या शतकात लिहिलेल्या प्रसिद्ध कादंबरी 'जर्नी टू द वेस्ट'मध्ये देखील हा वर-वधू निवडीचा प्रसंग चितारला आहे. या कादंबरीतील मुख्य कॅरेक्टर श्वेनजांगचे वडील त्याच्या आईची निवड अशाच प्रकारे चेंडू फेकून करतात. या घटनेद्वारे संपूर्ण कहाणी दाखविली आहे.

याच प्रकारे १९८९ चा प्रसिद्ध चिनी टीव्ही ड्रामा 'माय फेअर प्रिन्सेस'मध्ये एका श्रीमंत कुटुंबातील मुलगी अशा प्रकारे वराची निवड करताना दाखविली आहे. या कहाणीत तिचे वडील लग्नाला विरोध करतात. कारण मुलीचा चेंडू एक गरीब मुलगा झेलतो. अशा कहाण्या अनेकदा चित्रपटात, मालिकेत आणि साहित्यात दाखविण्यात आल्या आहेत. त्यामुळे अनेक लोकांना वाटते, की प्राचीन चीनमध्ये खरोखरच ही वर शोधण्याची पद्धत होती. परंतु इतिहास काही वेगळाच सांगतो.

दक्षिण चीनमध्ये गुआंग्शी झुआंग स्वायत्त क्षेत्रात राहणाऱ्या झुआंग समुदायात चेंडू फेकण्याची परंपरा खूप लोकप्रिय होती. झुआंग समुदायाची संख्या गुआंग्शीची लोकसंख्येच्या ३० टक्क्यांहून अधिक होती. येथे तरुण आणि तरुणी या चेंडूंचा वापर एकमेकांप्रती प्रेम जाहीर करण्यासाठी करायचे.

तिसऱ्या चंद्र महिन्याच्या तिसऱ्या दिवशी होणाऱ्या पारंपरिक फेस्टीव्हलमध्ये तरुण मोठ्या संख्येने जमा व्हायचे. येथे गाणी म्हटली जायची आणि तरुण-तरुणी एकमेकांना प्रेमाची मागणी घालायचे. जर दोन जोडपी एकमेकांना पसंद करत असतील, तर ते एकमेकांकडे चेंडू फेकायचे. अनेकदा चेंडूसोबत एक गिफ्ट देखील बांधले जायचे. म्हणजे केवळ चेंडू कॅच केला आणि लग्न झाले, असे व्हायचे नाही.






## मना सज्जना...

# सदा देवकाजी झिजे देह ज्याचा।

परम स्नेही मित्रहो...
समर्थ सद्गुरूंना विनम्र अभिवादन आणि प्रभू श्रीरामचंद्रांना त्रिवार वंदन.

**सदा देवकाजी झिजे देह ज्याचा ।**
**सदा रामनामे वदे नित्य वाचा ।**
**स्वधर्मेचि चाले सदा उत्तमाचा ।**
**जगी धन्य तो दास सर्वोत्तमाचा ॥ ४८॥**

श्लोक क्रमांक ४८ समजून घेण्यापूर्वी पुन्हा एकदा आपण 'जाणता' या शब्दाचा विचार करूया. मागील श्लोकाच्या चिंतनात आपण या शब्दाचा अर्थ उलगडण्याचा प्रयत्न केला होता. समर्थ रामदास स्वामी 'जाणता' हा शब्द सहजपणे वापरत नाहीत. हा शब्द म्हणजे अनेक सद्गुणांचा समुच्चय आहे. विवेक, कर्तव्यनिष्ठा, भक्ती, लोककल्याणाची भावना, आत्मसंयम आणि धर्मनिष्ठ आचरण यांचा सुंदर मिलाफ म्हणजे 'जाणता.'

समर्थांनी हाच शब्द आणखी एका महत्त्वाच्या ठिकाणी वापरला आहे. तो म्हणजे छत्रपती शिवाजी महाराजांना लिहिलेल्या पत्रात. शके १५७१ (इ.स. १६४९) मध्ये लिहिलेल्या या १५ ओव्यांच्या पत्रात समर्थांनी शिवरायांचा उल्लेख 'जाणता राजा' असा केला आहे. हा केवळ गौरवोद्गार नाही, तर शिवरायांच्या व्यक्तिमत्त्वाचे अचूक मूल्यमापन आहे.

**निश्चयाचा महामेरू । बहुत जनांचा आधारू ।**
**अखंड स्थितीचा निर्धारू । श्रीमंत योगी ॥ १॥**
**परोपकाराचिया राशी । अखंड घडती जयाशी ।**
**तयाचे गुणमहत्त्वासी । तुलना कैची ॥ २॥**
**नरपती हयपती गजपती । गडपती भूपती जळपती ।**
**पुरंधर आणि आदिशक्ती । पृष्ठभागी ॥ ३॥**
**यशवंत कीर्तीवंत । सामर्थ्यवंत वरदवंत ।**
**पुण्यवंत नीतीवंत । जाणता राजा ॥ ४॥**

या काही ओव्यांमधून समर्थांनी शिवरायांच्या व्यक्तिमत्त्वातील निश्चय, पराक्रम, लोकसंग्रह, प्रजेप्रती असलेली अपार बांधिलकी, धर्मरक्षणाची तळमळ आणि न्यायप्रियता यांचे अत्यंत नेमके चित्र उभे केले आहे. एवढ्या थोडक्या शब्दांत इतके व्यापक व्यक्तिचित्र उभे करण्याचे सामर्थ्य समर्थांच्या लेखणीतच होते. हे संपूर्ण पत्र वाचणे म्हणजे प्रेरणा आणि आनंदाचा अनमोल ठेवा अनुभवणे होय. लेखकाच्या संग्रही या पत्राची प्रत आहे.
आता या श्लोकाकडे वळूया.
'सदा देवकाजी झिजे देह ज्याचा...'

समर्थ म्हणतात, ज्याला प्रभू श्रीरामचंद्रांचा सर्वोत्तम दास व्हायचे आहे, त्याने आपला देह, मन, बुद्धी आणि कर्तृत्व हे ईश्वरकार्यासाठी अर्पण केले पाहिजे. येथे 'देवकाज' म्हणजे केवळ मंदिरातील पूजा-अर्चा नव्हे. सत्याचे रक्षण करणे, गरजवंताला मदत करणे, समाजहिताचे कार्य करणे, कर्तव्य प्रामाणिकपणे पार पाडणे आणि प्रत्येक कृतीत ईश्वरभाव ठेवणे, हेही देवकार्यच आहे.

'सदा रामनामे वदे नित्य वाचा' या ओळीत समर्थ नामस्मरणाचे महत्त्व सांगतात. वाणीवर रामनाम असेल, तर विचारही शुद्ध होतात. विचार शुद्ध झाले की आचरण शुद्ध होते आणि आचरण शुद्ध झाले की जीवन आपोआपच पवित्र बनते. नामस्मरण हा केवळ जप नसून मनाला स्थिर करणारा, अंतःकरण निर्मळ करणारा आणि जीवनाला दिशा देणारा साधनामार्ग आहे.
'स्वधर्मेचि चाले...' याचा अर्थ केवळ जातिधर्म नव्हे. प्रत्येकाने आपल्या कर्तव्याचे प्रामाणिक पालन करणे, आपल्या भूमिकेशी निष्ठावान राहणे, सत्य, न्याय आणि सदाचार यांचा स्वीकार करणे म्हणजे स्वधर्म. जो आपल्या स्वधर्माचे आचरण करतो, त्याच्या जीवनात स्थैर्य, समाधान आणि कृतार्थता येते.
समर्थ म्हणतात, अशा प्रकारे देवकार्यात आयुष्य झिजवणारा, मुखी अखंड रामनाम ठेवणारा आणि स्वधर्माचे पालन करणारा मनुष्यच खऱ्या अर्थाने 'सर्वोत्तमाचा दास' ठरतो. असे जीवनच धन्य आहे.
दासबोधात समर्थ म्हणतात-
**सकल धर्मामध्ये धर्म ।**
**स्वरूपी राहणे हा स्वधर्म ॥**
स्वतःच्या आत्मस्वरूपाची जाणीव ठेवून, ईश्वराशी एकरूप होण्याचा अखंड प्रयत्न करणे, हाच खरा धर्म आहे. जीवन कृतार्थ व्हावे, अशी प्रत्येकाची इच्छा असते. त्यासाठी बाह्य दिखावा नव्हे, तर अंतःकरणातील भक्ती, निष्काम सेवा, अखंड नामस्मरण आणि स्वधर्माचे निष्ठेने पालन हीच खरी साधना हवी.

**। जय जय रघुवीर समर्थ! ।**

**- भाऊसाहेब देशमुख, अमळनेर.**
**मो. : ९४२०३८९५४१**

# शनीची पनवती साडेसातीपेक्षाही कठीण?

## २०२७ मध्ये 'या' २ राशी शनी पनवतीच्या कचाट्यात, नेमका काय परिणाम होतो? जाणून घ्या

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

हिंदू धर्म आणि ज्योतिषशास्त्रात शनिदेवांना कर्मफळदाता म्हटले जाते. अनेकांना शनी साडेसाती माहिती आहे. पण शनीची पनवती काय असते हे कमी लोकांना माहिती आहे. ज्योतिषीय मान्यतेनुसार शनी पनवतीच्या काळात व्यक्तीच्या जीवनात काही आव्हाने, जबाबदाऱ्या आणि बदल अनुभवास येऊ शकतात. जाणून घ्या काय असते ही पनवती? आणि २०२७ मध्ये कोणत्या राशी याच्या कचाट्यात सापडतील?

शनीची पनवती म्हणजे काय?
ज्योतिषशास्त्रात शनीची पनवती (ढैया किंवा अडीच वर्षांचा शनी) हा शनिग्रहाच्या संक्रमणाशी संबंधित कालावधी मानला जातो. जेव्हा शनी जन्मराशीपासून चौथ्या किंवा आठव्या राशीत भ्रमण करतो तेव्हा त्या कालावधीला 'पनवती' असे म्हणतात. हा कालावधी साधारण अडीच वर्षांचा असतो. ज्योतिषशास्त्रानुसार सध्या शनी मीन राशीत आहे आणि ३ जून २०२७ रोजी मेष राशीत प्रवेश करेल. शनी मेष राशीत प्रवेश करताच २ राशी शनीच्या प्रभावातून मुक्त होतील आणि याची सुरूवात दोन राशींसाठी होईल.



**२०२७ मध्ये शनी पनवतीचा कोणत्या राशींवर परिणाम होईल?**

२०२७ मध्ये शनिच्या पनवतीच्या कोणत्या दोन राशींवर परिणाम होईल? ज्योतिषींच्या मते ३ जून २०२७ रोजी शनी मेष राशीत प्रवेश करेल. या परिस्थितीत कर्क आणि मकर राशींवर शनीची पनवती सुरू होईल. कोणत्या राशी लहान पनवतीतून मुक्त होतील? ज्योतिषशास्त्रानुसार ३ जून २०२७ रोजी सिंह आणि धनू राशी शनीच्या लहान पनवतीतून मुक्त होतील. यामुळे तुमची प्रलंबित कामे पूर्ण होण्यास सुरूवात होईल.

**कन्या :** या राशीच्या व्यक्तींना आरोग्याशी संबंधित समस्यांना सामोरे जावे लागू शकते. अचानक खर्च वाढू शकतो. मोठ्या मालमत्तेतील गुंतवणूक काळजीपूर्वक करावी लागेल. त्यांना नोकरी आणि व्यवसायात अडथळे येऊ शकतात. नातेसंबंध बिघडू शकतात.

**मकर :** या राशीच्या व्यक्तींना जीवनाच्या विविध क्षेत्रांमध्ये चढ-उतार अनुभवायला मिळतील. त्यांची आर्थिक परिस्थिती कमकुवत होऊ शकते. कोणाशी तरी वाद होण्याची शक्यता आहे. तुमच्या कष्टाचे फळ मिळण्यास थोडा उशीर होऊ शकतो. मानसिक ताण वाढू शकतो. जमीन, इमारती किंवा वाहनांशी संबंधित बाबींमध्ये अत्यंत सावधगिरी बाळगली पाहिजे. कुटुंबातील सदस्यांशी मतभेद होण्याची शक्यता आहे.

पनवती नेहमीच अशुभ असते का?
नाही. ही एक सामान्य गैरसमजूत आहे. ज्योतिषशास्त्रानुसार शनी हा कर्मफळ देणारा ग्रह मानला जातो. जर एखाद्याच्या कुंडलीत शनी शुभ स्थितीत असेल, तर पनवतीच्या काळातही करिअरमध्ये प्रगती, आर्थिक स्थैर्य आणि महत्त्वाच्या जबाबदाऱ्या मिळू शकतात.

### साडेसातीचे टप्पे किती व कोणते?

**१) साडेसातीचा पहिला टप्पा आणि त्याचा अनुभव**
साडेसातीचे एकूण तीन टप्पे (प्रत्येक अडीच वर्षांचा) असतात.
पहिल्या टप्प्यात अचानक आलेले अडथळे, आर्थिक ताण, मानसिक दबाव, नोकरी-व्यवसायातील संघर्ष आणि नात्यांमधील दुरावा यांसारख्या समस्यांना सामोरे जावे लागते. शनीदेव हे न्यायदेवता आहेत; ते केवळ कर्माचा हिशेब ठेवतात आणि मानवाला परिपक्व बनवितात.

**२) पहिला टप्पा संपल्यानंतर होणारे चार प्रमुख बदल**
* **मानसिक स्थैर्य :** डोक्यावरील अनावश्यक ताण आणि भीती कमी होऊन मन शांत होईल व योग्य निर्णय घेण्याचा आत्मविश्वास परत येईल.
* **अडकलेल्या कामांना गती :** नोकरीमध्ये पदोन्नती, व्यवसायात नवीन संधी आणि अनेक दिवसांपासून अडकलेल्या कामांना सुरूवात होईल.
* **आर्थिक आवक व स्थिरता :** अवाजवी खर्चावर नियंत्रण येईल, उत्पन्नाचे नवीन मार्ग मोकळे होतील आणि अडकलेले पैसे परत मिळण्याची शक्यता निर्माण होईल.
* **नात्यांमधील गोडवा :** जवळच्या व्यक्तींमधील गैरसमज दूर होतील आणि कुटुंबातील कलह कमी होऊन संवाद दृढ होईल.

**३) घ्यावयाची काळजी (महत्त्वाच्या गोष्टी)**
* कोणावरही डोळे झाकून विश्वास ठेवू नका आणि व्यवहारात स्पष्टता ठेवा.
* यश मिळायला लागल्यावर अहंकार बाळगू नका आणि चुकीच्या मार्गाने पैसा कमावणे टाळा.
* घरातील ज्येष्ठांचा आणि कामाच्या ठिकाणी वरिष्ठांचा आदर करा.

**४) शनी देव प्रसन्नतेसाठी प्रभावी उपाय**
* **मंत्रजप :** दर शनिवारी ॐ शं शनैश्चराय नमः या मंत्राचा १०८ वेळा जप करावा [०५:३८].
* **दान-धर्म :** गरजू व्यक्तींना अन्न, कपडे किंवा शनिवारी शनी मंदिरात काळ्या तिळाचे दान करावे [०५:४८].
* **पिंपळाची पूजा :** शनिवारी संध्याकाळी पिंपळाच्या झाडाला जल अर्पण करून तिळाच्या तेलाचा दिवा लावावा [०५:५६].
* **हनुमान चालीसा :** दर शनिवारी किंवा दररोज हनुमान चालीसाचे पठण करावे; मारुतीरायाची भक्ती केल्यास शनीचा प्रकोप कमी होतो


# सूर्य-केतु युति : १७ अगस्त से ३ राशियों की किस्मत होगी बुलंद

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

ग्रहों के राजा सूर्य १७ अगस्त २०२६ को अपनी स्वराशि सिंह में गोचर करेंगे। ज्योतिष शास्त्र में सूर्य का सिंह गोचर एक अत्यंत शुभ और प्रभावशाली घटना मानी जाती है। कहा जाता है कि सूर्य जब अपनी स्वराशि में आते हैं, तो इनका शुभ प्रभाव कई गुना बढ़ जाता है। इस समय केतु भी सिंह राशि में हैं। इस तरह से सिंह राशि में सालों बाद सूर्य और केतु की युति बनेगी। पंडित नरेंद्र उपाध्याय बताते हैं कि जब दो ग्रह किसी राशि में पास या नजदीक आते हैं, तो युति बनती है। सिंह राशि में केतु-सूर्य पास आ रहे हैं और युति का निर्माण करेंगे। सूर्य-केतु की युति सभी राशियों पर अलग-अलग प्रभाव डालेगी, लेकिन कुछ राशियों के लिए यह अत्यंत शुभ और सकारात्मक परिणाम प्रदान करने वाली साबित होगी। सूर्य सिंह राशि में एक महीने तक रहेंगे। सूर्य-केतु का प्रभाव भी १७ अगस्त से अगले ३० दिनों तक राशियों पर प्रभावी रहेगा।

## ३० दिन तक बंपर लाभ के संकेत





**सूर्य-केतु युति : १७ अगस्त से इन राशियों को मिलेगा लाभ**

**१) सिंह राशि-** यह राशि के लिए सूर्य-केतु युति अत्यंत शुभ साबित होगी। इस समय आपका पराक्रम रंग लाएगा। आत्मविश्वास में वृद्धि का अनुभव करेंगे। सामाजिक मान-प्रतिष्ठा में वृद्धि के संकेत हैं। खुशियों का आगमन होगा। किसी शुभ समाचार की प्राप्ति हो सकती है। कार्यस्थल पर मनचाहे परिणाम मिलेंगे। भाग्य का साथ मिलेगा। आपके निर्णय लेने की क्षमता मजबूत होगी। नौकरी में तरक्की के योग बन रहे हैं।

**२) कन्या राशि-** यह राशि के लिए यह समय लाभकारी सिद्ध होगा। इस समय आपके आय के नए-नए स्रोत बनेंगे। पुराने साधनों से भी रुपए-पैसे आएंगे। किसी अच्छी खबर की प्राप्ति हो सकती है। मेहनत का पूरा फल मिलेगा। उच्चाधिकारी आपके काम से प्रसन्न हो सकते हैं। भूमि, भवन और वाहन की खरीदारी के योग हैं। भौतिक सुख-संपदा में वृद्धि होगी। कार्यक्षेत्र में आपकी नई पहचान बन सकती है। सीनियर्स आपके काम से प्रभावित होंगे। व्यापारिक उत्थान हो सकता है।

**३) मकर राशि-** यह राशि वालों को सूर्य-केतु युति अच्छे परिणाम प्राप्त होगा। कामकाज की स्थिति सुधरेगी। अटके हुए कार्य पूर्ण होंगे। भाग्य का साथ मिलेगा। व्यापारिक स्थिति में सुधार होगा। महत्वपूर्ण कार्यों में सफलता हो सकती है। धन की स्थिति में सुधार के संकेत हैं। आपका कोई सपना पूरा हो सकता है। मनचाही यात्रा पर जा सकते हैं। खर्च में कमी आएगी और बचत पर जोर देंगे। परिवार के साथ अच्छा समय बिताएंगे।

# संपत शनिवार आणि श्रावणातील अश्वत्थ पूजन

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

श्रावणात शनिवारी शनिदेवांची करावयाची पूजा म्हणजे संपत् शनिवारचे व्रत. या दिवशी येणाऱ्या याचकाला विन्मुख पाठविले जात नाही. कारण शनिदेव स्वतः याचकाचे रूप घेऊन भक्ताच्या दारात उभे राहतात, अशी श्रद्धा आहे. या दिवशी काही भक्त भाकरी व केनीकुर्डूची भाजी करतात. तसेच शनिदेवांना प्रिय असणाऱ्या वस्तूंचा नैवेद्य दाखवून त्यांचे स्तवन केले जाते.

**संपत शनिवारची कहाणी**

आटपाट नगर होते. तिथे एक आपला गरीब ब्राह्मण राहात होता. त्याला तीन सुना होत्या. पावसाळ्यात या दिवशी तो लवकर उठे. सकाळीच जेवी, लेकी-सुनांसुद्धा शेतावर नेई. धाकट्या सुनेला मात्र घरी ठेवी. याप्रमाणे आपला नित्याप्रमाणे शेतावर गेला. जाताना घरी सुनेला सांगितले, "मुली-मुली, आज शनिवार आहे. माडीवर जा. घागरी-मडक्यांत काही दाणे पाहा. थोडेसे काढ. दळून त्याच्या भाकरी कर. केनीकुर्डूची भाजी कर. तेरड्याचे बी वाटून ठेव." सुनेने बरे म्हटले. माडीवर दाणे पाहू लागली. अर्ध्या भाकरीपुरते दाणे निघाले तेवढेच तिने दळले. त्याच्या लहान-लहान भाकरी केल्या. केनीकुर्डूची भाजी केली. तेरड्या टाकळ्याचे बी वाटले नि सासूसासऱ्यांची वाट पाहत बसली.

इतक्यात तिथे शनिदेव कुष्ठ्याच्या रूपाने आले आणि म्हणाले, "बाई-बाई, माझे सर्व अंग ठणकत आहे, माझ्या अंगाला तेल लाव, ऊन पाण्यांने अंघोळ घाल. घरात गेली, चार तेलाचे थेंब घेतले, त्यांच्या अंगाला तेल लावले. वाटलेले बी लावून ऊन पाण्याने अंघोळ घातली. भाकरी खाऊ घातली. त्याचा आत्मा थंड केला. तसा कुष्ठ्याने तिला आशीर्वाद दिला, तो काय दिला?" तुला काही कमी पडणार नाही" म्हणून म्हणाला. आपले उष्टे वळचणीला खोचले, शनिदेव अदृश्य झाले. काही वेळाने घरी सासू-सासरे, दीर-जावा आल्या. त्यांनी सर्व तयारी उत्तम पाहिली, संतोषी झाली. आपल्या घरात तर काही नव्हते. हे असे कशाने आले, म्हणून आश्चर्य करू लागली.



दुसऱ्या शनिवारी ब्राह्मणाने दुसऱ्या सुनेला घरी ठेवले. सगळी माणसे घेऊन शेतावर गेला. इकडे काय मौज झाली? शनिदेवांनी मागच्यासारखेच कुष्ठ्याचे रूप घेतले, ब्राह्मणाच्या घरी आले. मागच्या सारखेच मला न्हाऊ घाल, माखू घाल, म्हणून म्हणू लागले. ब्राह्मणाची सून घरी होती ती त्याच्याशी बोलू लागली, "बाबा, आम्ही काय करावे! आमच्याजवळ काही नाह." देव म्हणाले, "जे असेल त्यांतलेच थोडेसे मला दे." ब्राह्मणाची सून मजजवळ काही असले तरी नाहीसे होईल." असा त्यांनी शाप दिला नि आपण अंतर्धान पावले. ब्राह्मणाची सून माडीवर गेली. हांडी-मडकी पाहू लागली. तिला काही सापडले नाही. संध्याकाळ झाली, सासू-सासरे घरी आली. सर्व तयारी पाहू लागली. तो त्यांना काहीच दिसेना. मग सुनेला राग भरली. सुनेने झालेली हकीकत सांगितलेली.

पुढे तिसरा शनिवार आला. ब्राह्मणाने तिसऱ्या सुनेला घरी ठेवले. जेवणाची तयारी चांगली कर म्हणून सांगितले. आपण उठून शेतावर गेला. इकडे मागच्यासारखे शनिदेव आले. ब्राह्मणाच्या सुनेला, अंगाला तेल लाव म्हणून म्हणू लागले. तिने दुसऱ्या जावेसारखा जबाब दिला. देवांनी तिला पूर्वीसारखा शाप दिला आणि आपण अंतर्धान पावले. पुढे काय झाले? काही वेळाने सासू-सासरे घरी आले, जेवणाची तयारी पाहू लागले, तो तिथे काही दिसेना. मग त्यांनी सुनेला विचारले, मागच्यासारखीच हकीकत ऐकली. सगळ्यांना उपवास पडला, मनात फार खिन्न झाली.

पुढे चौथा शनिवार आला. ब्राह्मणाने धाकट्या सुनेला घरी ठेवले. पहिल्यासारखीच आज्ञा केली आणि आपण निघून शेतावर गेला. इकडे शनिदेवाने काय केले? गलितकुष्ठ्याचे रूप धरले. ब्राह्मणाचे घरी आला. सुनेला म्हणू लागला. "बाई-बाई, माझे अंग ठणकत आहे, त्याला थोडे तेल लाव." तिने बरे म्हटले. अंगाला तेल लावले, ऊन पाण्याने अंघोळ घातली. भाजी-भाकर खायला दिली. त्याचा आत्मा थंड झाला. तेव्हा देवाने तिला आशीर्वाद दिला. तो काय दिला? असाच तुझाच आत्मा देव थंड करील म्हणून म्हणाला. आपले उष्टे वळचणीला खोचले आणि आपण अंतर्धान पावला. पुढे ब्राह्मणाची सून माडीवर गेली. हांडी-मडकी पाहू लागली. डाळदाणा दृष्टीस पडला. तो काढला, तिने चांगला स्वयंपाक केला आणि सासू-सासऱ्यांची वाट पाहत बसली. इतक्यात सासू-सासरे तिथे आली. सुनेला विचारू लागली. "मुली-मुली, आज तू काय केले आहेस?" सुनेने सांगितले, "सगळी तयारी आहे. न्हायला तेल आहे. टाकळ्याची चोखणी आहे. अंघोळीला ऊन पाणी आहे. जेवायला बाजरीची भाकरी आहे. तोंडी लावायला केनीकुर्डूची भाजी आहे." सासू-सासऱ्यांना आनंद झाला. "आपल्या घरात तर काही नव्हते आणि इतके सामान कुठून आणलेस?" म्हणून तिला विचारले. तिने कुष्ठ्याची हकीकत सांगितली. दिलेला आशीर्वाद सांगितला. सासऱ्याला आनंद झाला.

इतक्यात काय चमत्कार झाला? सासऱ्यांची दृष्टी वळचणीकडे गेली. तिथे काही खोचलेले दृष्टीस पडले. त्यांनी ते सोडून पाहिले तो पत्रावळींवर हिरे-मोती दृष्टीस पडली सुनेला दाखविली. याच पत्रावळींवर तो कुष्टी जेवला म्हणून तिने सांगितले. सासरा म्हणाला, "देवाने मुलीला दर्शन दिले." पुढे दुसऱ्या सुनांना हकीकत विचारली, त्यांनी दोन वेळा आला होता म्हणून सांगितले, "आम्ही त्याला काही दिले नाही, त्याचा त्याला राग आला. नंतर त्याने तुमच्याजवळ काहीच नसेल म्हणून सांगितले आणि त्याच दिवशी हांड्या-मडक्यांत दाणे नाहीसे झाले. म्हणून दोन शनिवार आपणाला उपवास पडला." पुढे सासू-सासऱ्यांनी शनिदेवाची प्रार्थना केली. मुलीला आशीर्वाद दिला व नेहमी शनिदेवांची पूजा करू लागली.

जसा शनिदेव त्यांना प्रसन्न झाला. तसा तुम्हा आम्हा होवो. ही साठा-उत्तरांची कहाणी, पाचा उत्तरी सुफळ संपूर्ण.